जितुकें काही आपणास ठावें । तितुके हळूहळू शिकवावे ।
शहाणे करूनि सोडावे । बहुत जन ।।
-दासबोध १९-१०-१४

पाण्याच्या प्रवाहात दगडधोंडे असतात, म्हणून तर त्यातून मधुर संगीत तयार होते. लढाई जोराची झाली तर विजयाचा आनंद वाढतो. वाटचालीत अडथळेच नसतील तर रस्ता चुकला असे समजायचे!

# आपले जग

RNI रजि नं.:३५७१५/७९
किर्लोस्करवाडी-सांगली
वर्ष :४३ वे
स्थापना :१२ फेब्रुवारी १९७९

१ ते १० सप्टेंबर २०२१
किंमत रु. ५/-

**कर्नल आर.डी.निकम सैनिक सहकारी बँक लि. * विशेष पुरवणी : ३७वा वार्षिक अहवाल**

# नव्या जगातील नवी वाटचाल

**प्रिय सैनिक, सभासद, सहकारी व हितचिंतक परिवार**
**जयहिंद,**

वार्षिक सभेच्या निमित्ताने आपण सर्व एकत्र भेटत होतो, गेल्या पस्तीस वर्षांची ती परंपरा होती. आपले पदाधिकारी, बँकेचे अधिकारी तसेच हितचिंतक असे सर्वजण प्रत्यक्ष भेटून विचार विनिमय आणि परस्परांचे क्षेम कुशल करीत होतो. तथापि गेल्या काही वर्षात मोबाईल आणि संगणक क्षेत्राने क्रांती केली आहे. बँकेच्या कामकाजात अशा तांत्रिक व्यवस्था आपण हळूहळू सुरू केल्या होत्या; परंतु दोन वर्षांपूर्वी कोविड १९च्या संकटाने अशा प्रत्यक्ष गाठीभेटी दुरावल्या. गेल्या वर्षीची वार्षिक सभा कशी घ्यायची याबद्दल काही काळ निर्णयच होत नव्हता. शासनाकडून परवानगी आणि स्पष्टता मिळण्यात बराचसा वेळ गेला. शेवटी ती वार्षिक सभासुद्धा आभासी पद्धतीने (व्हीसी द्वारा) गेल्या मार्च अखेरीस आपण घेतली.

यात विशेष सांगायचा मुद्दा असा की, अशा नव्या तंत्राने सर्व सभासदांशी संपर्क करताना त्याला कितीसा प्रतिसाद मिळेल याची शंका वाटत होती. मी स्वत: किंवा माझे समवयस्क संचालक व सभासद अशा प्रकारच्या नव्या तंत्राला सरावलेलो नाही हे तर उघड आहे. ही नवी साधने आपली नातवंडे जितक्या सहज हाताळू शकतात तितकी आपल्याला ही तंत्रे जमत नाहीत. त्यामुळेच गेल्या वार्षिक सभेत आभासी पद्धतीने कितीसे लोक सहभागी होतील याची उत्सुकता वाटत होती. परंतु आश्चर्य व आनंदाने सांगतो की गावोगावच्या सभासदांनी पुढच्या पिढीच्या मदतीने त्या वार्षिक सभेचे कामकाज मोठ्या संख्येने पूर्णत: यशस्वी केले. बँकेच्या व्यवहारात आपण पीओएस, जी-पे, रु-पे, एटीएम अशी नवी तंत्रे आणलेली आहेत. त्यांचा उपयोग केला जातो. अलीकडच्या काळात फौजी बांधवांसाठी असलेली दुकाने व खाद्यगृहे (मिलिटरी शॉप्स व मिलिटरी कँटीन) या ठिकाणीसुद्धा रोख पैसे देण्याऐवजी आपले लोक डेबिट/क्रेडीट कार्डचा उपयोग करू लागले आहेत, हेही लक्षात येते. आपल्याकडे ही तंत्रे, ॲप्स वगैरे डाऊनलोड करण्यासाठीचे दर खूप कमी आहेत. त्यामुळे सामान्य माणूसही या सुविधा सहज वापरतो.

कोविड संकटाने एक गोष्ट शिकवली की या प्रकारची तंत्रे आपल्याला अवगत करून घेतलीच पाहिजेत. पूर्वी खेडेगावी अंगठेबहाद्दर लोक सही करू लागले की त्याला साक्षर झाला असे म्हणत. आजच्या काळात शेतामळ्यात कामाला जाणाऱ्या बायकासुद्धा पाण्याची बाटली आणि मोबाईल बाळगू लागल्या आहेत. आपली नातवंडे घरात बसून शाळा शिकू लागली आहेत आणि शिकलेली तरुण पिढी घरात बसूनच त्यांच्या कंपनीचे काम करू लागली आहेत. आपल्या संरक्षण क्षेत्राचा विचार केला तर जुन्या शस्त्रांचा काळ कधीच मागे पडला. आता आपला शत्रूसुद्धा ड्रोन आणि क्षेपणास्त्रे वापरू लागला आहे. त्यांच्याशी लढायचे तर आपण 'हे तंत्र आम्हाला अजूनी जमत नाही' असे म्हणताच येणार नाही. आपल्या बँकेची चालू वार्षिक सभासुद्धा आभासी पद्धतीनेच आपण योजिली आहे आणि यापुढे शक्य तितक्या ठिकाणी हीच नवी तंत्रे वापरावी लागणार आहेत. त्यात मागे राहून चालणारच नाही. ऑनलाईन बँकिंग वगैरे गोष्टी चालू झाल्याच आहेत. त्यात वयस्कर लोक कदाचित फसतात. कुणीतरी कुठूनतरी फोन करतो, मेसेज पाठवतो. तुम्हाला मोठे बक्षिस लागले, पेन्शन फरक मंजूर झाला.... वगैरे. मग हुरळून कुणी फसतात. त्याला इलाज नाही. ती सावधता बाळगावी; ज्यांना जमत नाही त्यांनी यात पडायचे नाही!!

या तंत्राच्या बाबतीत सर्वजण सहकार्य करतील. त्याचबरोबर आणखी एक गोष्ट मनात येते ती अशी की बँकींग, नवे अर्थव्यवहार आणि नव्या आर्थिक संकल्पना या बाबतीतसुद्धा नव्या युगात पुष्कळसे बदल संभवतात. सर्वांनी तेही समजून घ्यायला हवेत. आपल्या देशाचे सकल राष्ट्रीय उत्पन्न (जीडीपी) कमी झाले आहे. गेल्या वर्षी कोरोनाच्या संकटामुळे देशातील सेवाक्षेत्रे, लघु-मध्यम उद्योग हे संकटात आले. त्यामुळे तेथील उत्पादन कमी झाले; पण ती कसर शेतीच्या क्षेत्राने दमदारपणे भरून काढली, ही आनंदाची आणि उत्साहाची बाब आहे. आपल्याला स्वातंत्र्य मिळाल्यापासून अन्नधान्य आणि खाद्यवस्तू बाहेरून आणाव्या लागत होत्या. शेतीचे क्षेत्र कायम घाट्यात असायचे. गेल्या वर्ष-दोन वर्षांपासून आपल्या देशाच्या अर्थव्यवस्थेला शेतीने आधार दिला आहे. शेतीच्या बाबतीत शासनाची आणि राजकारण्यांची धोरणे



**कॅप्टन यू.आर.निकम**
अध्यक्ष-महाराष्ट्र माजी सैनिक व पेन्शनर्स संघटना
अध्यक्ष-कर्नल आरडी निकम सैनिक सहकारी बँक लि.

पुष्कळशी धरसोडीची आहेत. शिवाय अनुदान, कर्जमाफी, सूट-सवलती वगैरे आशा दाखवली जाते. त्यामुळे बँकेने दिलेली कर्जे वसूल होणे महाकठीण होते. देशातील कोणतीही बँक शेतीसाठी कर्ज देण्याला घाबरू लागली आहे. यापुढे शेतीचे उत्पादन नव्या पद्धतीने वाढत गेले तर अर्थव्यवस्था आणि संपूर्ण ग्रामीण जीवन बदलून जाणार आहे, त्याचा विचार करून आपल्या बँकेलाही शेतीच्या बाबतीत प्रोत्साहनाचे धोरण अवलंबावे लागेल.

तिकडे दिल्लीत शेतकरी आंदोलन चालू आहे. शेतकऱ्यांच्या मालाला हमी भाव मिळायला हवा. वास्तविक तिकडे गहू खरेदी योजना आल्यावर थेट शेतकऱ्यांच्या खात्यावर पैसे जमा होऊ लागले. परंतु आडते लोक त्यात घुसू लागले. मग चौकशी सुरू झाली. नावावर जमीन नाही तर एवढा गहू आणला कुठून? चांगल्या योजनांचा या प्रकारे गैरफायदा सुरू होतो. तो रोखण्यासाठीसुद्धा हे आधुनिक बँकिंग उपयोगी पडणार आहे.

पूर्वी दूर गावच्या बाजारात टोमॅटो-फ्लॉवर अशा भाज्या मिळत नसत, त्या पुण्याहून आणवत. आता सर्वत्र भाजीपाला-विविध पिके घेतात. सुधारणा होतेय. आता ग्रीन हाऊसचे नवे तंत्र आले. तिथे पाणी-औषधे कमी लागतात, नासाडी टळते, खर्चात बचत होते. त्याचा अभ्यास करून अवलंब केला पाहिजे. एकेकाळी साखर कारखान्यांचे प्रस्थ वाढले. त्याच काळात इथेनॉलचे उत्पादन सुरू व्हायला हवे होते. त्यामुळे दराचा प्रश्न सोपा झाला असता आणि पेट्रोल-डिझेल वाचवता आले असते.

*(पुढे चालू .....)*

शेतीसुद्धा केवळ बागायती ऊसपिकाची रूढ झाली आहे. त्यात बदल झाला पाहिजे. दुष्काळी व कमी पाण्याच्या जमिनीत नवे शेतकरी डाळींब, बोर, सिताफळ घेतात. तसे बेलफळ, आवळा, जत्रोफा(एरंडमोगली), देशी बाभळ अशी पिके नव्या युगात खूप फायद्याची ठरणार आहेत. आपल्यातील एका सैनिकाने शेततळे तयार करून त्यात मत्स्यशेती यशस्वी केली आहे. आपल्या बँकेने शेतीसाठी कर्ज देताना व्याजदर कमी ठेवला आहे. कुक्कुटपालनासाठी बरेच कर्ज दिले आहे. हल्ली दगड घिरटून त्याची वाळू बनवतात, तसा एक उद्योग पाहायला गेलो होतो. त्या सद्‌गृहस्थाने वेगळे मासे पाळले आहेत. दक्षिण आफ्रीकेतील त्याचे बीज त्याने कलकत्त्याहून विमानाने आणले. त्या एका मत्स्यबीजाची किंमत २५रु. होती. ते आणण्यासाठी पॉलिथीन पिशवीच्या पोकळीत प्राणवायू भरून मासे जिवंत ठेवावे लागले. कोल्हापूर भागात अशी मत्स्यशेती करणाऱ्यांनी ते तंत्र कोकणातून शिकून घेतले आहे. लोक या प्रकारचे खूप काहीतरी करत असतात. बँकिंग क्षेत्रानेही अशांचा शोध घेऊन प्रोत्साहन व अर्थसाहाय्य दिले पाहिजे. आपणही शेतीचा विचार प्राधान्याने करूया. आजपर्यंत आपण रताळ्यासारखा पदार्थ केवळ उपवासाला खाण्यापुरता पिकवत होतो. त्याचे काप, चकत्या आणि वेफर्स तयार केले तर रताळ्यासारखे चार-पाच महिन्यांचे पीक उत्तम फायदा देऊ शकते हे काहीजणांनी सिद्ध करून दाखवले आहे. याच प्रकारे घाटमाथ्यावरील नाचणी, डोंगरी भागातील सोनचाफा असे कितीतरी प्रयोग आणि उत्पादने पुढच्या काळात आपल्याला घेता यायला पाहिजे. आपली बँक त्यासाठी सहकार्य करेल.

सहकारी बँकांनी सभासदांनाच कर्ज द्यायचे, हा नियम आहे. किंवा मग कर्ज देण्यापूर्वी त्यास सभासद करून घ्यायचे. यात संस्थेची निवडणूक हा एक नाजूक विचार असतो. पुढची निवडणूक जिंकण्यासाठी 'आपल्या उपयोगा'चे सभासद करून घेतात मग तेवढ्यांनाच कर्ज देतात, तिथे बोटचेपे धोरण येते. आपल्या बँकेत असला काही प्रकार नाही. बँकेची स्थापना करणारे कर्नलसाहेब आणि त्यांचे चार-सहा सोबती हे त्या काळातही सांगायचे की बँकेच्या उद्दिष्टाशी प्रामाणिक राहून पक्षपात न करता नीट काम केले तर लोक तुमच्या मागे येतीलच. येत्या काळात सभासदांशिवाय कुणालाही मुक्तपणे कर्जे देता येतील असे धोरण केंद्र सरकार आणेल असे ऐकतो. भारताच्या अर्थमंत्र्यांनी अन्य काही धोरणात्मक बदल जाहीर केले आहेत. पूर्वी एक लाखाच्या ठेवीला विम्याचे संरक्षण होते, ते पाच लाखाच्या ठेवीपर्यंत वाढविले आहे. अडचणीतील बँकांच्या ठेवीदारांना पाच लाखापर्यंत ठेव नव्वद दिवसांत परत मिळेल. आणखी एक प्रस्ताव म्हणजे ठेवीदारांची संमती असेल तर त्यांची रक्कम बँकेला शेअर भांडवलाप्रमाणे वापरता येईल व अर्थातच त्यावर जास्तीचा मोबदला देता येईल. हे बदल स्वीकारताना त्याचा फायदा करून घ्यायचा की अडचणी सांगत बसायचे हा ज्याचा त्याचा प्रश्न असतो.

या प्रकारचे नियम व धोरणे आणून रिझर्व्ह बँक आपल्यासारख्या सहकारी बँकांवर जास्त बंधने घालते असाही एक प्रवाद आहे. अर्थशास्त्र आणि आर्थिक हिशोबातील चोखपणा एवढाच विचार केला तर बँक अथवा कोणताही उद्योग फायद्यात चालला पाहिजे, हे बरोबरच आहे. ज्या सहकारी संस्थाचालकांना राजकीय पार्श्वभूमी व तोच आधार असतो, त्या संस्था गोत्यात येऊ शकतात. बँकातील ठेवींना विमा संरक्षण मिळेल, पण विम्याचा योग्य हप्ताच काही बँका भरत नाहीत. आपल्या बँकेने सर्व ठेवींसाठी अद्ययावत् विमा हप्ता भरलेला असतो हे लक्षात घ्यावे.

आजपर्यंत सहकार हा विषय ज्या त्या राज्यापुरता होता. अलीकडे केंद्र सरकारने स्वतंत्र सहकार खाते निर्माण केले आहे. त्यांच्याकडून आणखी काही नवी धोरणे येऊ शकतील. मुळातच सहकारी संस्थेच्या बाबतीत 'एकमेका साहाय्य करू....' अशी एक सामाजिक बाजू होती. काही मंडळींनी त्याचा गैरफायदा घेऊन सहकारी संस्था घोटाळ्यात आणल्या. सहकाराची उत्तम लोकशाही संकल्पना लोकांच्याच टीकेचा विषय झाली. त्यावर उपाय म्हणून आता आर्थिक बंधने कठोर करावी लागत आहेत. आपल्या बँकेच्या बाबतीत या नव्या धोरणांचा फारसा परिणाम संभवत नाही. कारण प्रथमपासूनच गुणवत्ता-व्यावसायिकता-सहकारिता यांचा मेळ घालून आपण चोखपणा सांभाळला आहे. आपल्या राज्यात सहकाराला खूप वाव आहे. गुजरातच्या 'अमूल'चं उदाहरण सर्वांना माहीत आहे.

सहकारात सामाजिक बाजूचा विचार करतानासुद्धा परिस्थितीनुसार काही बदल करावे लागतील. बँकेच्या वतीने आपण आपल्या सभासदांच्या गुणवत्ताधारक मुलामुलींसाठी शिष्यवृत्ती देत होतो. चालू वर्षी दहावी-बारावीचे निकाल जवळ जवळ शंभर टक्के लागले आहेत; सगळीच मुले भरपूर गुणांनी उत्तीर्ण झाली. त्यामुळे आपण देत असलेल्या शिष्यवृत्ती पुन्हा विचारात घ्याव्या लागतील. इच्छुक, कुशल व हुशार मुलांसाठी नवी योजना करावी लागेल. त्यामध्ये पुढच्या आयुष्यक्रमासाठी मार्गदर्शन (करिअर गाईडन्स), काही प्रशिक्षण-सहली अशा कल्पना पुढे येतील. पुढच्या पिढ्यांना फौजी जीवनाचे दर्शन घडवावे अशीही एक कल्पना आहे. त्यासाठी राष्ट्रीय संरक्षण प्रबोधिनी (एनडीए), बंगलोरचा विमान कारखाना(हिंदुस्थान एरोनॉटिक्स), युद्धनौका, सीमावर्ती लष्करी ठाणे अशा ठिकाणी निवडक मुलांना नेऊन आणावे असेही काही जणांनी सुचविले आहे. सेवानिवृत्त झालेल्या ग्रामीण भागातील लोकांसाठी पाटोदे, हिवरे बाजार वगैरे नव्या दृष्टीची खेडी दाखवून आणायला हरकत नाही. पण असे नवे काही शिकण्या-पाहण्याऐवजी लोक देवदर्शन सहली करतात. या गोष्टींसाठी बँक सगळा खर्च करेल असे समजू नये; आपल्या लोकांनी त्यासाठी काही खर्च करूनसुद्धा नव्या गोष्टी पाहायला शिकायला हव्यात. बँक त्यासाठी नियोजन व मार्गदर्शन करू शकेल.

आपल्याकडील तरुण मुलामुलींना खेळ आणि स्पर्धा यांचे आकर्षण वाटले पाहिजे. प्रारंभी उल्लेख केलेले मोबाईलचे तंत्रज्ञान कारणापुरते वापरलेच पाहिजे; परंतु नवी पिढी मोबाईच्या मायाजालात अडकत आहे ते गैर होईल. नुकत्याच ऑलिम्पिक स्पर्धा झाल्या. त्यात महिलांचा हॉकीसंघ आणि ईशान्य भारताच्या आडवळणी भागातील खेळाडू चमकले आहेत. लष्करामध्ये खेळ आणि खेळाडू(स्पोर्ट्स) याला किती महत्व असते हे वेगळे सांगायला नको. राष्ट्रीय व आंतराष्ट्रीय पातळीवर चमकणारे खेळाडू पुष्कळसे लष्करातलेच असतात ही वस्तुस्थिती आहे. आपल्याकडे गावोगावची मैदाने ओस पडत चालली आहेत. आपण सर्वांनी त्याही बाबतीत काय करता येईल हे पाहायला हवे. नेमबाजी, रायफल क्लब, बॉक्सिंग इत्यादी क्रीडाप्रकार आपल्याकडे रुजविता येतील. कबड्डी-कुस्ती या खेळांतील बदल जाणून घ्यावेत. आंतरराष्ट्रीय स्पर्धा गाजविणारे खेळाडू कुठल्या तरी आडवळणी गावातले, सामान्य कुटुंबातील आहेत. चटणी-भाकरी खाणारे आहेत. मग ती जाहिरातीमधली 'हॉर्लिक्स' मुलं कुठे आहेत? तसली 'आधुनिकता' नको आहे.

क्रीडाक्षेत्रासाठी सरकार पुढे यायचे ते येईलच; पण गावोगावच्या लोकांनीही प्रयत्न करायला हवेत. सातारा जिल्ह्यात सज्जनगडजवळ कारी नावाचे गाव आहे. तिथं एक शिक्षिका होत्या. त्यांनी मुलींचा एक संघ तयार केला होता. त्या मुली दोरीवरचा मलखांब उत्तम करायच्या. तो संघ घेऊन त्या परदेशीही जाऊन आल्या. मराठा रेजिमेंटमध्ये ॲथलेटिक्सला खूप वाव देतात. जिम्नॅस्टिक्सला खास मॅट्स तिथे उपलब्ध असतात. गावाकडची मुलं व्हॉलीबॉल वगैरे उत्तम खेळतात. पण खेळाच्या नावाखाली हल्लीचे 'हाफ पीच क्रिकेट' वगैरे प्रकार आले. पुढाऱ्यांच्या वाढदिवसाला त्याच्या स्पर्धा होतात. तो तंत्रशुद्ध खेळच नव्हे. त्यातून चांगले खेळाडू तयार होणार नाहीत; केवळ खेळखंडोबा होईल!! आपण क्रीडासंस्थेला आर्थिक मदत अजूनी केलेली नाही, पण सहकारातून अशी सर्व क्षेत्रे विकसित करता येतील.

या सर्वांचा थोडक्यात मतितार्थ असा की, नव्या जगाला सामोरे जाताना सर्वांच्याच जीवनक्रमात खूप बदल फार वेगाने होणार आहेत हे लक्षात घ्यावे. मागील पानावरून तेच पुढे चालू.... असा पायंडा आजवर चालून जात होता. यापुढे अनेक क्षेत्रे पुढच्या पिढीसमोर खुली झालेली आहेत. प्रगतीशील शेतीचे महत्व जाणून बँकेचे नवे धोरण आखावे लागेल. तसेच खेळ-कला-उद्योग ही सांस्कृतिक बाजूही मोठी करावी लागेल. आपला समाज समर्थ झाला तर तेही देशाच्या संरक्षणाचेच काम होईल. कारण यापुढील काळात युद्ध हे केवळ सीमेवर शस्त्रास्त्रांनी समोरासमोरच होईल असे नाही -प्रत्येक क्षेत्रात आपल्याला विकसित-वरचढ व्हावे लागेल. त्यासाठी नागरिक हाच सैनिक म्हणून जबाबदारी पार पाडू शकतो. ज्यांच्यावर लष्करी जीवनाचे संस्कार आहेत, परंपरा आहेत त्यांनी या गोष्टीचा विचार करून योग्य ते बदल करावेत. आपली बँक माध्यम म्हणून तुम्हा सर्वांच्या यशात सहभागी राहील अशी ग्वाही या निमित्ताने देतो.

येता काळ आपल्या सर्वांच्या परिवारांना स्वस्थतेचा, सुखाचा व्हावा अशी शुभेच्छा व्यक्त करतो आणि उत्कर्षाच्या वाटचालीत आपल्या बँकेलाही सोबत घ्यावे असे आवाहन करतो.

आपला स्नेहांकित सहकारी,

**कॅप्टन उदाजी निकम (रि.)**

जय जवान जय किसान जय विज्ञान

देशरक्षणाइतकंच अर्थकारण जपणारी

# कर्नल आर.डी.निकम सैनिक सहकारी बँक लि.

१७८/२ ब, रविवार पेठ, छत्रपती शिवाजी महाराज सर्कल, पोवई नाका, सातारा – ४१५ ००१

स्थापना : १९८५ (सर्वांसाठी)

फोन (०२१६२) २३११५६, २३३९१३, २३९१२७ E-mail: helpdesk@sainikbank.com

Website : www.sainikbank.com ग्राहक सुविधा क्रमांक (Costumer Service Number) - ९१४६१९१४६१




## सदतीसाव्या वार्षिक सर्वसाधारण सभेची नोटीस

*(केवळ सभासदांसाठी)*

बँकेच्या सर्व सभासदांना विनंतीपूर्वक कळविण्यात येते की, आपल्या बँकेची सदतीसावी वार्षिक सर्वसाधारण सभा रविवार दिनांक २६ सप्टेंबर २०२१ रोजी सकाळी ११–३० वाजता आपल्या बँकेचे मुख्यालय, १७८/२ ब, रविवार पेठ, छत्रपती शिवाजी महाराज सर्कल, पोवई नाका, सातारा–४१५००१ येथील बँकेच्या सभागृहामध्ये आभासी (व्हीसी द्वारा) ऑनलाईन पद्धतीने आयोजित करण्यात आली आहे. तरी या सभेत सर्व सभासदांनी आभासी (व्हीसी द्वारा) ऑनलाईन पद्धतीने सहभागी व्हावे, ही नम्र विनंती.

### *सभेपुढील विषय*

*१. मागील दि.२७ मार्च २०२१ रोजी झालेल्या वार्षिक सर्वसाधारण सभेचे इतिवृत्त वाचून कायम करणे.*

*२. मा.संचालक मंडळाने शिफारस केलेल्या कामकाजासंबंधीचा सन २०२०–२१चा अहवाल, नफा–तोटा पत्रक व दि.३१ मार्च २०२१ अखेरचा ताळेबंद यास मंजुरी देणे.*

*३. मा.संचालक मंडळाने शिफारस केल्यानुसार सन २०२०–२१मध्ये झालेल्या निव्वळ नफ्याच्या विभागणीस मंजुरी देणे.*

*४. सन २०२०–२०२१ मध्ये अंदाजपत्रकापेक्षा जादा झालेल्या खर्चास मंजुरी देणे व सन २०२१–२२ या आर्थिक वर्षाकरिता मा.संचालक मंडळाने मंजूर केलेल्या अंदाजपत्रकास मंजुरी देणे.*

*५. सन २०२०–२०२१ अखेरच्या वैधानिक लेखापरीक्षकांच्या अहवालाची नोंद घेणे.*

*६. मा.संचालक मंडळाने सन २०२१–२०२२करिता केलेल्या अंतर्गत लेखापरीक्षकांच्या नेमणुकीची नोंद घेणे.*

*७. भारतीय रिझर्व्ह बँकेच्या दिनांक २७–०४–२०२१रोजीच्या मार्गदर्शक सूचनांना अनुसरून मा.संचालक मंडळाने सन २०२१–२०२२ करिता बँकेच्या वैधानिक लेखापरीक्षणासाठी प्राधान्यक्रमासह वैधानिक लेखापरीक्षक यांची नियुक्ती करून भारतीय रिझर्व्ह बँकेकडे पूर्व मंजूरीसाठी पाठविलेल्या प्रस्तावांन्वये बँकेचे वैधानिक लेखापरीक्षक म्हणून ऑडीट फर्म मे.पाटील देवाडीगा अँड असोसिएटस्, चार्टर्ड अकौंटंटस्, कराड यांच्या नावास पूर्व मंजुरी मिळाली आहे. त्यास व त्यांचा मेहनताना यास कार्योत्तर मंजुरी देणे.*

*८. मा. संचालक मंडळाने ज्या थकबाकीदार सभासदांना त्यांचेकडील थकित व्याज, चक्रवाढव्याज, दंडव्याज, वसुली खर्च, व इतर खर्चात सूट दिली आहे, त्या रकमेस मंजुरी देणे.*

*९. वैधानिक लेखापरीक्षकांनी प्रमाणित केलेली व ज्या खात्यात वसुलीची शक्यता नाही अशी खाती वसुलीचे सर्व हक्क अबाधित राखून निर्लेखित करणे.*

*१०. वार्षिक सर्वसाधारण सभेस अनुपस्थित असलेल्या सर्व सभासदांची अनुपस्थिती क्षमापित करणे.*

*११. मा.अध्यक्षसो यांच्या परवानगीने आयत्या वेळी येणाऱ्या विषयांचा विचार करणे.*

*मा.संचालक मंडळाच्या आदेशानुसार*

*(वाय.ए.देसाई)*
*मुख्य कार्यकारी अधिकारी*

ठिकाण – सातारा
दिनांक – ०१ सप्टेंबर २०२१

### –: विशेष सूचना :–

१. गणसंख्येच्या अभावी सभा तहकूब झाल्यास, ती सभा त्याच दिवशी अर्ध्या तासानंतर त्याच ठिकाणाहून घेतली जाईल. अशा सभेला गणसंख्येचे बंधन राहणार नाही. या सभेत वरील नोटीशीमध्ये नमूद केलेल्या विषयांचा विचार करण्यात येईल.

२. बँकेचा सन २०२०–२१ अखेरचा ३७वा वार्षिक अहवाल, ताळेबंद व नफा–तोटा पत्रक बँकेच्या प्रधान कार्यालय सातारा व सर्व शाखांचे नोटीस बोर्डवर, तसेच बँकेच्या website : www.sainikbank.com वर प्रसिद्ध करण्यात आले आहे. तरी सभासदांना विनंती की, प्रसिद्ध केलेला अहवाल नजिकच्या शाखेत अथवा वेबसाईटवर पाहावा.

३. ज्या सभासदांना बँकेच्या कामकाजासंबंधी काही माहिती विचारावयाची असेल तर त्यांनी आपल्या सूचना, बँकेचा ईमेल आयडी helpdesk@sainikbank.com यावर सभेच्या नियोजित तारखेपूर्वी किमान सात दिवस अगोदर बँकेकडे पाठवाव्यात.

४. कोविड १९ या वैश्विक महामारीच्या पार्श्वभूमीवर महाराष्ट्र शासनाच्या दि. ३० जुलै २०२१च्या परिपत्रकान्वये सदर सभा आभासी (व्हीसी द्वारा) ऑनलाईन पद्धतीने घेण्याच्या मार्गदर्शक सूचनांनुसार वरीलप्रमाणे आपल्या बँकेची वार्षिक सर्वसाधारण सभा आभासी (व्हीसी द्वारा) ऑनलाईन पद्धतीने www.sainikbank.com या संकेत स्थळावरून आयोजित करण्यात आली आहे.

५. या आभासी (व्हीसी द्वारा) ऑनलाईन पद्धतीने होणाऱ्या वार्षिक सर्वसाधारण सभेचा दिनांक, वेळ, ठिकाण व लिंक याबाबतची माहिती एसएमएस/ईमेल/व्हाट्सअॅप द्वारे आपणास किमान सात दिवस अगोदर कळविण्यात येईल.

६. ज्या सभासदांनी आपला ईमेल आयडी, मोबाईल क्रमांक बँकेकडे रजिस्टर केलेला नाही त्या सभासदांनी त्यांची माहिती बँकेचा ईमेल आयडी helpdesk@sainikbank.com व ग्राहक सुविधा क्रमांक ९१४६१९१४६१ यावर एसएमएस/व्हाट्सअॅप द्वारे आपले संपूर्ण नाव, पत्ता व मोबाईल क्रमांकासह दिनांक १८ सप्टेंबर २०२१पर्यंत पाठवावी.

७. वर नमूद मुद्दा क्र.५ व्यतिरिक्त, आपणास सदर आभासी(व्हीसी द्वारा) ऑनलाईन पद्धतीने होणाऱ्या सभेची नोटीस(वार्षिक अहवाल) प्राप्त होताच आपण आपला मोबाईल क्रमांक, ईमेल आयडी बँकेकडे रजिस्टर केल्याची खातरजमा करावी; नसल्यास आपण आपली माहिती आपल्या ओळखपत्रासह, सभासद प्रमाणपत्र किंवा सभेची नोटीस सोबत घेऊन आपल्या नजीकच्या शाखेमध्ये कार्यालयीन वेळेत व सार्वजनिक सुट्या वगळता दिनांक १८ सप्टेंबर २०२१पर्यंत समक्ष येऊन आपले नाव, मोबाईल नंबर व ईमेल आयडी यासह रजिस्टर करू शकता.

८. वरीलप्रमाणे बँकेकडे रजिस्टर असलेल्या व नव्याने रजिस्टर झालेल्या सर्व सभासदांना त्यांचे मोबाईल क्रमांकावर व ईमेल आयडीज्वर आभासी (व्हीसी द्वारा) ऑनलाईन पद्धतीने होणाऱ्या आपल्या बँकेच्या वार्षिक सर्वसाधारण सभेसाठी **www.sainikbank.com** या संकेत स्थळावरून सभेत सहभागी व्हावे. या सभेसाठीची **www.sainikbank.com** ही लिंक पुनश्च दि.२४–०९–२०२१ पासून पुढे सभेपूर्वी पाठविली जाईल.

९. ''माझे कुटुंब माझी जबाबदारी''– सभासदांनी नियमित मास्कचा वापर करावा, सुरक्षित अंतर ठेवावे, साबणाने हात धुवावेत, स्वत:ची व इतरांची काळजी घ्यावी. आपण घरीच रहा व सुरक्षित रहा.

**टीप : आपल्या बँकेच्या पोटनियम क्र.६२ अन्वये वार्षिक सर्वसाधारण सभा आटोपल्यानंतर सहभागी सर्व सभासदांना प्रशिक्षण देण्यात येणार आहे.**

## कर्नल आर.डी.निकम सैनिक सहकारी बँक लि.

### सदतीसावा वार्षिक अहवाल

सन्माननीय सभासद बंधू-भगिनींनो,

**१. प्रास्ताविक**

नुकत्याच संपलेल्या आर्थिक वर्षात आपल्या बँकेने साधलेल्या प्रगतीसाठी कर्नल आर.डी.निकम सैनिक सहकारी बँकेच्या परिवारातील सभासद, ग्राहक, हितचिंतक व कर्मचारी या सर्व घटकांचे, मी मा.संचालक मंडळाच्या वतीने सर्वप्रथम हार्दिक अभिनंदन करतो. तसेच आपल्या बँकेच्या सदतीसाव्या वार्षिक सर्वसाधारण सभेत सहभागी असलेल्या सर्व सभासद बंधू-भगिनींचे मी मा.संचालक मंडळाच्या वतीने हार्दिक स्वागत करतो.

आपल्या बँकेचे संस्थापक अध्यक्ष कर्नल आर.डी.निकम यांचे हे जन्मशताब्दी वर्ष (१० जून १९२० ते १० जून २०२१) होते. या शताब्दी वर्षानिमित्त बँकेने आपल्या व्यवसायवृद्धीसाठी तसेच सामाजिक बांधिलकीसाठी कार्यक्रमांची आखणी केली होती. मात्र कोविड-१९ या वैश्विक महामारीमुळे काही अपवाद वगळता, या सर्व कार्यक्रमांचे नियोजन रद्द करावे लागले. कर्नल आर.डी.निकम यांच्या पवित्र स्मृतीस अभिवादन करीत असताना त्यांनी आजी-माजी सैनिकांसाठी, सभासदांसाठी जी सहकारिता राबविली त्या सहकार मंदिराचे पावित्र्य अबाधित ठेवण्याचे आश्वासन मी संचालक मंडळाच्या वतीने देत आहे. या निमित्ताने आपल्या भारतीय बँकिंग क्षेत्रात झालेल्या घडामोडींचा आढावा घेणे आवश्यक वाटते.

भारतीय रिझर्व्ह बँकेने आर्थिक वर्ष सन २०२१-२२मध्ये नवनवीन विषय नागरी बँकांनी पूर्ण करावेत असे आदेशित केले आहे. यामध्ये केंद्र सरकारने डिजीटल सेवेला प्रोत्साहन देत असतानाच रिझर्व्ह बँकेने बँकांच्या सायबर सिक्युरिटी पॉलिसी व सुरक्षितता बाबत ठोस पाऊल उचलणे, बँकांनी आपली ग्राहक सेवा चांगली व सुरक्षित करण्यावर भर देणेस रिझर्व्ह बँकेने बँकांना मार्गदर्शक सूचना केल्या आहेत. रिझर्व्ह बँकेने सुधारीत बँकिंग नियमन कायद्यातील दुरुस्तीस अनुसरून सर्व नागरी सहकारी बँकांनी संचालक मंडळास पूरक असे व्यवस्थापन मंडळ स्थापन करणे, बँकेच्या वैधानिक लेखापरीक्षणासाठी लेखापरीक्षकाची नियुक्ती करणे तसेच बँकेच्या मुख्य कार्यकारी अधिकारी यांची नियुक्ती करणे व यास रिझर्व्ह बँकेची पूर्व परवानगी घेणे बंधनकारक केले आहे. यावरून रिझर्व्ह बँकेची नागरी सहकारी बँकांबाबतची कडक भूमिका दिसून येते.

यास अनुसरून बँकेने आपल्या संचालक मंडळास पूरक असे व्यवस्थापन मंडळ स्थापन करून तसा व्यवस्थापन मंडळ स्थापन केल्याचा प्रस्ताव ना हरकत मिळविण्यासाठी भारतीय

*(पुढे चालू...)*

रिझर्व्ह बँकेकडे पाठविला आहे. याबरोबरच आपल्या मा.संचालक मंडळाने आपल्या बँकेच्या वैधानिक लेखापरीक्षणासाठी लेखापरीक्षकाची नियुक्ती करणेबाबत लेखापरीक्षकांची नियुक्ती प्राधान्यक्रमासह मंजुरीचा प्रस्ताव विहीत नमुन्यात रिझर्व्ह बँकेकडे पाठविला आहे व त्यास पूर्व मंजूरी मिळाली आहे. तसेच बँकेच्या मुख्य कार्यकारी अधिकारी यांच्या फेरनियुक्तीचाही प्रस्ताव विहीत नमुन्यात मान्यतेसाठी रिझर्व्ह बँकेकडे पाठविला आहे.

याबरोबरच केंद्र सरकारने नुकतेच केंद्रीय सहकार मंत्रालय स्थापन केले असून अनेक संस्थांनी केंद्रीय सहकार मंत्रालय स्थापनेच्या निर्णयाचे स्वागत केले आहे. या निमित्ताने सहकाराची बाजू संसदेमध्ये प्रभावीपणे मांडली जाईल किंबहुना स्वतंत्र मंत्रालय असल्याने सहकाराचा स्वतंत्रपणे विचार केला जाईल अशी आशा बाळगण्यास हरकत नाही. तसेच राज्य सहकारी कायद्यामध्येही सकारात्मक बदल होतील असे वाटते.

आपल्या बँकेने अहवाल सालात ''www.sainikbank.com'' या नावाने बँकेची स्वत:ची अधिकृत वेबसाईट सुरू केली असून याद्वारे बँकेची सर्व माहिती, तसेच बँकेच्या विविध ठेव व कर्ज योजनांची माहिती उपलब्ध करून दिली आहे. याच वेबसाईटचा वापर करून सन २०१९-२० या सालाची वार्षिक सर्वसाधारण सभा आभासी (व्हीसी द्वारा) ऑनलाईन पद्धतीने यशस्वीरित्या पार पडली आहे. आर्थिक वर्ष सन २०२०-२१ सालासाठीची वार्षिक सर्वसाधारण सभा याच पद्धतीने बोलावण्यात आली आहे. यापुढे आपल्या बँकेच्या सर्व सभासद, ग्राहक, हितचिंतक यांच्यासाठी बँकेची ध्येय धोरणे, बँकींग सेवा व सुविधा, बँकेचे सामाजिक बांधिलकी उपक्रम यांची माहिती वेळोवेळी वेबसाईटवर (संकेतस्थळ) प्रसिद्ध केली जाणार आहे. तरी सर्व सभासद, ग्राहक, हितचिंतक यांना विनंती की, आपण या वेबसाईटचा अवश्य लाभ घ्यावा.

आजही अर्थव्यवस्था व प्रशासकीय यंत्रणा कोरोना महामारीमुळे अनिश्चिततेच्या सावटाखाली असल्याचे दिसून येते. सबब राज्य शासनाने ज्या सहकारी संस्थांच्या निवडणुका लॉकडाऊनमुळे अडकलेल्या आहेत, त्या संस्थांच्या मा.संचालक मंडळास राज्य शासनाने वेळोवेळी मुदतवाढ दिली असून प्रलंबित संस्थाच्या निवडणुकांना ३१ ऑगस्ट २०२१ पर्यंत मुदत वाढ दिली आहे.

मात्र मार्च २०२१ पासून कोरोनाने राज्यात पुन्हा एकदा डोके वर काढले आहे. त्यामुळे राज्य सरकारने नाईलाजाने एप्रिलपासून राज्यात कडक निर्बंध लादले. एकंदरीत सन २०२१-२२ हे आर्थिक वर्षही बँकांसाठी खडतर व आव्हानात्मक असणार आहे. यास तोंड देण्यासाठी बँकांनी आतापासूनच तयारी करायला हवी आहे.

नवीन आर्थिक वर्ष २०२१-२२ची पहिली तिमाही संपली. कोरोना संसर्गाच्या दुसऱ्या लाटेनंतर एप्रिलपासून लावण्यात आलेले निर्बंध अद्यापि पूर्णपणे हटलेले नाहीत तोपर्यंत तिसऱ्या लाटेची चाहूल लागली आहे. महाराष्ट्रात काही जिल्ह्यांतील संसर्ग आजही कमी होताना दिसत नाही. त्यामुळे निर्बंध उठवले जात नाहीत. बँकींग क्षेत्र विशेषत: नागरी सहकारी बँकिंग अद्यापि मोठ्या संक्रमण अवस्थेतून जात आहे. अर्थव्यवस्थेचा वेग खूप कमी असल्यामुळे बँकांकडे कर्ज मागणी खूप कमी आहे. सर्वसामान्य लोकांचा या परिस्थितीत खर्च करण्यापेक्षा हातावरील शिल्लक राखून ठेवण्याकडे कल वाढला आहे. त्यामुळे बाजारात अपेक्षित उभारी येत नाही. बँकांकडे ठेवीचा ओघ आहे मात्र कर्जमागणीचा नाही.

मागील वर्षी रिझर्व्ह बँकेने कोविड पीडित व्यवसाय क्षेत्रासाठी पॅकेज जाहीर केले होते. त्यानुसार बँकांनी कर्जदारांची खाती रिफेज केली होती. त्याच धर्तीवर यावर्षी देखील रिझर्व्ह बँकेने ३१ मार्च २०२१ रोजी स्टॅंडर्ड असणाऱ्या व मागील वर्षाच्या रिझोल्यूएशन फ्रेमवर्कचा फायदा न घेतलेल्या खात्यांसाठी रिझोल्यूएशन फ्रेमवर्क २ योजना जाहीर केली आहे. सदर योजना लागू करताना कर्ज खात्यांच्या येणे रक्कमेच्या प्रमाणात खूप मोठ्या प्रमाणावर तरतूद करावी लागण्याची शक्यता आहे असे वाटते.

कोवीड १९ या वैश्विक महामारीवर नियंत्रण आणण्यासाठी सर्वांनीच लसीकरण करून घेण्याचे आवाहन शासनाकडून केले जात आहे. मात्र लसीकरण झाले तरी कोरोना प्रतिबंधासाठी सर्वांनी घराबाहेर असताना मास्कचा वापर करणे, सुरक्षित सामाजिक अंतर ठेवणे, वारंवार हात साबणाने धुणे या तीन सूत्रीचे पालन करावे व इतरांनाही त्यांचे पालन करण्यास प्रवृत्त करावे.

**आपल्याला सांगताना आनंद होतो की, या कोरोना महामारीच्या अनुषंगाने केंद्र व राज्य सरकारच्या सर्व नियमांचे काटेकोर पालन करून बँकेने आपल्या स्तरावर विविध उपाययोजना करून त्यांची काटेकोर अंमलबजावणी केली. यानुसार आपल्या सर्व सेवकांनी कोविड योद्ध्याप्रमाणे बँकेचे दैनंदिन काम केले व आपल्या ग्राहकांना सुरक्षित सेवा पुरविली. त्याचप्रमाणे आजही आपले सर्व सेवक आपली सेवा कोविड योद्ध्याप्रमाणे बजावीत आहेत. या रोगावर नियंत्रण ठेवण्यासाठी उपाय म्हणजे लसीकरण करून घेणे, लोकांनी एकमेकांपासून सुरक्षित अंतर ठेवणे, मास्क वापरणे, वारंवार हात धुणे, वृद्ध व लहान मुलांनी घरीच थांबणे, आवश्यकता असेल तरच घराबाहेर पडणे, अनावश्यक प्रवास टाळणे अशा गोष्टींबाबत आपल्या सेवकांनी जनजागृतीही केली.** सर्वांनी लस घेऊन स्वत:ची व कुटुंबाची काळजी घेणे आवश्यक आहे. शासनाच्या या लसीकरण मोहिमेमध्ये आपण स्वत: वेळेत लसीचे दोन डोस घेऊन कोविड १९ या वैश्विक महामारीस प्रतिबंध करण्यासाठी हातभार लावावा.

वरील सर्व बाबी व बँकांवर होणारे परिणाम यांतून सावरत बँकेने कठीण काळात व्यवसाय उद्दिष्टे कमीअधिक प्रमाणात साध्य करून सन २०२०-२१मध्ये आपल्या बँकेने कामकाजाच्या क्षेत्रात प्रगतीबाबत सातत्य राखून चांगली वाटचाल केली आहे. याचा तपशील पुढे अहवालात दिला आहे. अहवालसालात नमूद अर्थव्यवस्थेत विविध झालेल्या घडामोडींमुळे बँकेची सभासदसंख्या, वसूल भाग भांडवल, कर्ज व ठेवी यांमध्ये वाढ अल्पशी दिसून येते. आपल्या बँकेचे भांडवल पर्याप्तता प्रमाण अपेक्षित ९% पेक्षा कितीतरी अधिक म्हणजे १८.०१% इतके आहे. बँकेचे संचालक व सेवकांनी कर्ज वसुलीचे निकराचे प्रयत्न करून निव्वळ एनपीएचे प्रमाण ०.००% ठेवण्यात बँकेला यश आले आहे. सरकारी कर्ज रोख्यातही रिझर्व्ह बँकेच्या आदेशानुसार आवश्यक तेवढी गुंतवणूक केली आहे. वास्तविक या गुंतवणुकीमुळे बँकेला आपल्या ठेवीवरील सरासरी व्याजदरापेक्षा कमी व्याज मिळते. तथापि रिझर्व्ह बँक व सहकार खात्याच्या सर्व आदेशांचे काटेकोरपणे पालन आपली बँक करते.

सन २०२०-२१ या आर्थिक वर्षाचे शेवटी मार्च महिन्यामध्ये सुरू झालेल्या व आर्थिक वर्ष सन २०२१-२२ या चालू आर्थिक वर्षाच्या पहिल्या तिमाहीमध्येच कोरोनाची दुसरी लाट संपूर्ण देशात झपाट्याने पसरली आणि दुसरी लाट पहिल्या लाटेच्या कितीतरी जास्त प्रमाणात दिसून आली. राज्यशासनाने पुन्हा मिनी लॉकडाऊन सुरू केला आणि याचा परिणाम आर्थिक वर्षाच्या पहिल्या तिमाहीच्या व्यवसायावरही झालेला पाहावयास मिळतो. यावरून बँकेने विशेषत: मोठ्या प्रमाणावर कर्ज वाढ करणे, थकित व एनपीए कर्जखात्यांचे वसुलीसाठी व एकूण संमिश्र व्यवसाय वाढ इ. साठी भरीव प्रयत्न चालू केलेले आहेत. या कठीण काळातही आर्थिक वर्ष सन २०२१-२२मध्ये चांगले परिणाम मिळवण्यासाठी आम्ही प्रयत्नशील आहोत. याचा निश्चित सकारात्मक परिणाम थकबाकी व एनपीए कमी होण्यासाठी, एकूण संमिश्र व्यवसाय वाढीसाठी आणि पर्यायाने नफा वाढीसाठी होईल अशी आशा वाटते.

**२. श्रद्धांजली**

अहवाल सालात आपल्या बँकेचे मा. संचालक हवा. शिवाजी बळवंत बुवा यांचे दिनांक २० ऑक्टोबर २०२० रोजी आकस्मित निधन झाले. तसेच वन रँक वन पेन्शन लढ्यामधील व कर्नल आर.डी.निकमसाहेब यांचे सहकारी राहिलेले कर्नल इंद्रजित सिंह यांचे दि.३० ऑक्टोबर २०२० रोजी वृद्धापकाळाने निधन झाले. भारताचे माजी राष्ट्रपती व अर्थमंत्री प्रणव मुखर्जी यांचे दिनांक ३१ ऑगस्ट २०२० रोजी व भारताचे माजी संरक्षणमंत्री मा.जसवंत सिंह यांचे दिनांक २७ सप्टेंबर २०२० रोजी निधन झाले. तसेच दहशतवादी हल्ल्यामध्ये काही जवान शहिद झाले. कोविड १९ या महामारीमध्ये देशात सरकारी, सहकारी, खाजगी बँकांमध्ये सेवा देणारे बँकर्स, डॉक्टर्स, मेडीकल पॅरामिलीटरी स्टाफ व सबस्टाफ, पोलिस दलातील कर्मचारी, व्यापारी व सर्वसामान्य नागरिक अशा अनेकांची जीवितहानी झाली. तसेच अग्नीतांडव, महापूर व चक्रीवादळ या नैसर्गिक आपत्तीमुळे अनेकांची जीवितहानी झाली. त्या सर्वांना, तसेच अहवाल सालात बँकेचे सभासद, ग्राहक, हितचिंतक, सेवक व त्यांचे कुटुंबियांपैकी जे दिवंगत झाले, त्यांच्या नातेवाईकांच्या दु:खात आम्ही सहभागी आहोत. आमचे श्रद्धास्थान असलेले सैन्य, निमलष्करी दलातील जवान व अधिकारी ज्यांनी देशाच्या संरक्षणार्थ सेवा करताना आपल्या प्राणाचे मोल दिले, त्या सर्वांना आमची भावपूर्ण श्रद्धांजली. ईश्वर मृतात्म्यांस चिरशांती देवो!

**३. संगणकीकरण/कोअर बँकींग प्रणाली**

केंद्र शासनाने डिजीटल इंडियाचे स्वप्न साकारण्यासाठी विविध योजना, सेवा, सवलती जाहीर केलेल्या आहेत. त्याचा प्रामुख्याने उद्देश म्हणजे कॅशलेस व्यवहारावर भर देणे असून जास्तीत जास्त व्यवहार बँकांमार्फत व्हावेत असाही प्रयत्न आहे. यासाठी आवश्यक तो डिजीटल प्लॅटफॉर्म आपल्या बँकेकडे अगोदरच उपलब्ध आहे. याचा अधिक प्रभावीपणे वापर करून भविष्यात सर्व व्यवहार डिजीटल करण्यासाठी आपण सक्षम होत आहोत. यासाठी यापुढेही आपल्या अधिक सहकार्याची आवश्यकता आहे.

कोअर बँकिंग प्रणालीचा वापर करून आपली बँक RTGS, NEFT, ATM, POS(Point of sale), CTS, AEPS, DBTL व ECS इत्यादी सेवा देत आहे. आपल्या बँकेच्या व्यापारी खातेदारांना Merchant POS सेवा व QR Payment सुविधाही उपलब्ध करून दिली आहे. याबरोबरच आपल्या बँकेच्या ग्राहकांसाठी ई-कॉमर्स सुविधा सुरू केली असून यामुळे आपल्या बँकेच्या ग्राहकांना कॅशलेस पद्धतीने Amazon, Flipkart, Snapdeal, Walmart, Myntra, Olx इत्यादींकडील शॉपिंग ऑनलाईन पद्धतीने करता येईल. तसेच आपले वीजबील, मोबाईलबील, टीव्ही रिचार्ज, शैक्षणिक फी इ. सुरक्षिततरित्या दैनंदिन रु.१०हजार पर्यंत अदा करता येतील.

आपल्या बँकेच्या येरवडा, कोथरुड, फलटण, सांगली, चाफळ या शाखांमध्ये स्वत:च्या एटीएम मशिन कार्यान्वित असून आपल्या बँकेच्या ग्राहकांस इएमव्ही चिप बेस रुपे डेबिट कार्ड (Rupay Debit Card ) वापरण्याची सुविधाही उपलब्ध करून देण्यात आलेली आहे.

आपल्या बँकेला रिझर्व बँकेच्या परिपत्रकानुसार बिझनेस फॅसिलेटर्स व करस्पॉन्डंट द्वारा व्यवसाय सुरू करणेबाबत मान्यता यापूर्वीच मिळालेली आहे. याची अंमलबजावणी करून अतीदुर्गम

(पुढे चालू .....)

भागातसुद्धा बँकेच्या ग्राहकांना घरपोच सेवा देणे शक्य होणार आहे. सदर सुविधाही लवकरच सुरू करण्यासाठी बँक प्रयत्नशील आहे.

तसेच ग्राहकांना आपल्या रजिस्टर मोबाईलवर मिस्ड कॉल बॅलन्स इन्कायरी नंबर ०७९४९१३०४८४ उपलब्ध करून दिलेला असून सदर नंबरद्वारे आपले सेव्हिंग ठेव, चालू ठेव व इतर खातेवरील शिल्लक रक्कम समजू शकेल. यासाठी आपणास आपला मोबाईल नंबर खातेस रजिस्टर करावा लागेल.

चालू आर्थिक वर्ष सन २०२१-२२मध्ये UPI / IMPS च्या माध्यमाद्वारे इंटरनेट बँकिंग सुविधा सुरु करण्याचा आमचा प्रयत्न आहे. यासाठी आवश्यक त्या परवानगीसाठी भारतीय रिझर्व्ह बँकेकडे प्रस्ताव पाठवीत आहोत.

### ४. बँकेची कामगिरी

आर्थिक वर्षामध्ये आपल्या बँकेने वेगवेगळ्या आव्हानांना तोंड देऊन मागील वर्षाच्या तुलनेत पुढीलप्रमाणे आर्थिक प्रगती नोंदविली आहे.

**आर्थिकप्रगती**

(रु.लाखात)

| तपशील | २०१९-२० | २०२०-२१ | वाढीचे प्रमाण |
|---|---|---|---|
| सभासद | ५४००९ | ५४७५३ | १.३८% |
| वसूल भाग भांडवल | १४९६.२७ | १५२५.२८ | १.९४% |
| राखीव व इतर निधी | २८२९.५४ | ३२०४.९४ | १३.२७% |
| ठेवी | २९३५६.८७ | ३०५७६.६६ | ४.१६% |
| कर्जे | १८०४६.३१ | १८०२३.०९ | -०.१३% |
| गुंतवणूक | १४८९७.३० | १६५३०.३१ | १०.९६% |
| निव्वळ नफा | १६७.२७ | १९१.२६ | १४.३४% |
| खेळते भांडवल | ३४९९२.१८ | ३६६७२.८४ | ४.८०% |
| थकबाकी प्रमाण | ६.१५% | ५.८६% | |
| निव्वळ एन.पी.ए. | १.४७% | ०.००% | |
| भांडवल पर्याप्तता | १६.९३% | १८.०१% | |
| ऑडीट वर्ग | 'अ' | 'अ' | |
| लाभांश | ४.००% (मंजुरीसाठी शिफारस केली होती. #) | ६.५०% (मंजुरीसाठी शिफारस केली) | |

# मात्र अशी लाभांशाची रक्कम भारतीय रिझर्व्ह बँकेचे परिपत्रक क्र.DOR.BP.BC.No.64/21-02-067/2019-20 dated April 17, 2020 आणि परिपत्रक क्र.DOR.BP.BC.No.29/21-02-067/2020-21 dated Dec 04, 2020 अन्वये कोविड १९ या वैश्विक महामारीच्या अनिश्चिततेच्या वातावरणामध्ये, बँकांच्या भांडवलामध्ये वाढ होण्याच्या दृष्टीने रिझर्व्ह बँकेने दिनांक ३१ मार्च २०२०रोजी संपलेल्या आर्थिक वर्षाच्या नफ्यामधून लाभांश देणेसाठी शिल्लक ठेवलेली रक्कम वाटपासाठी प्रतिबंधित केली होती, अशी लाभांशाची रक्कम बँकेच्या सक्षमीकरणासाठी विविध निधीमध्ये जमा करण्यात आली आहे. सबब बँकेचे रिझर्व्हस भक्कम होण्यास मदत झाली आहे. याचे सविस्तर विवेचन मागील सन २०१९-२०च्या आर्थिक अहवालात मुद्दा क्र.४ बँकेची कामगिरी व मुद्दा क्र.९ नफाविभागणीमध्ये नमूद केलेले आहे.

### ५. सभासद आणि भाग भांडवल

अहवालसालात सभासदसंख्येत ७४४ ने वाढ होऊन दि. ३१ मार्च २०२१ अखेर सभासदसंख्या ५४७५३ इतकी झाली आहे. अहवाल वर्षअखेरीस भाग भांडवल रु.२९.०१ लाखाची (१.९४%) वाढ होऊन ते रु.१५२५.२८ लाखापर्यंत जाऊन पोहोचले आहे.

### ६. राखीव व इतर निधी

मागील वर्षाअखेर असणारी गंगाजळी व इतर निधीची रक्कम रु.२८२९.५४लाख, यामध्ये अहवाल सालात रु.३७५.४० लाख (१३.२७%)ने वाढ होऊन ती रु.३२०४.९४ लाखापर्यंत पोचली आहे. राखीव व इतर निधीमध्ये होत असलेली समाधानकारक वाढ ही बाब आपल्या बँकेचा भांडवली पाया (Capital Base)मजबूत असल्याचे अधोरेखित करणारी आहे.

### ७. ठेवी, कर्जे व गुंतवणूक

**ठेवी** - अहवाल वर्षात बँकेने आपल्या जिंदगी - देयतांचे (Asset - Liability Management) सुयोग्य व्यवस्थापन करून, इतर बँका प्रदान करीत असलेल्या ठेवींवरील तसेच कर्जावरील व्याजदरांचा सातत्यपूर्ण आढावा घेऊन, मुदत ठेवीवरील व्याजदर स्थिर ठेवल्याने जिंदगी-देयतांचे व्यवस्थापन योग्य तऱ्हेने करणे शक्य झाले आहे. दि.३१ मार्च २०२० रोजी बँकेच्या एकूण ठेवी रु.२९३५६.८७ लाख इतक्या होत्या, त्यामध्ये अहवालसालात रु.१२१९.७९ लाखाची वाढ होऊन आर्थिक वर्ष अखेरीस रु.३०५७६.६६ लाखापर्यंत वृद्धी झाली आहे. ठेव वृद्धीचे प्रमाण ४.१६% असे राहिले आहे. बँकेने ठेव विम्याचे हप्ते डिपॉझीट इन्शुरन्स ॲन्ड क्रेडीट गॅरंटी कार्पोरेशन (DICGC)कडे वेळेत भरलेले आहेत. त्याचा तपशील पुढे दिलेला आहे.

**कर्जे** - मार्च २०२०अखेर आपल्या बँकेची कर्जे रु.१८०४६.३१लाख इतकी होती. त्यामध्ये अहवाल सालात रु.२३.२२ लाखांनी(-०.१३%)ने उणे होऊन मार्च२०२१ अखेरीस रु.१८०२३.०९ इतकी झालेली आहेत. मार्च २०२१ अखेर बँकेचा एकूण संमिश्र व्यवसाय रु.४८५९९.७५ लाख इतका झाला आहे. बँकेचा संमिश्र व्यवसाय तसेच नफाक्षमता वाढीकरिता कर्ज व्यवहारात अधिकाधिक वाढ करणे अभिप्रेत असल्यामुळे, सभासद बांधवांनी विविध कर्ज योजनांचा अधिकाधिक लाभ घेण्याकरिता विनंती करण्यात येत आहे.

**गुंतवणूक** - मार्च २०२१अखेर बँकेच्या कर्जामध्ये झालेली अल्प वाढ व त्या तुलनेत ठेवीमध्येही झालेली वाढ यामुळे मागील वर्षी असणारी गुंतवणूक रु.१४८९७.३० लाखावरून चालू आर्थिक वर्षात रु.१६३३.०१ लाखाने वाढ होऊन ती रु.१६५३०.३१ लाख इतकी झाली आहे. गतवर्षीच्या तुलनेत गुंतवणुकीमध्ये १०.९६% नी वाढ झाली आहे. अहवालवर्षात आपल्या बँकेस सरकारी कर्जरोखे खरेदी-विक्रीच्या/मुदत संपलेल्या व्यवहारांतर्गत रु.४१.४० लाख इतका नफा प्राप्त झालेला आहे. रिझर्व बँक ऑफ इंडियाच्या आदेशानुसार एस.एल.आर.साठी कराव्या लागणाऱ्या संमत गुंतवणुकी (approved securities) शिवाय इतर गुंतवणुकीचाही यात समावेश आहे.

### ८. बाहेरील कर्जे

शाखांना आर्थिक व्यवहारातील सोयीसाठी, विशेषत: अनपेक्षित येणाऱ्या अधिक रक्कमेच्या बँकेवरील (इनवर्ड) क्लिअरिंग, एटीएम आणि पॉस व्यवहार इ.चे योग्य प्रकारे व्यवस्थापन करण्यासाठी बँकेने खालीलप्रमाणे ओव्हरड्राफ्टची सोय उपलब्ध ठेवलेली आहे. बँकेने ही सोय त्या त्या बँकेच्या मुदत ठेवीच्या तारणावर करून घेतली आहे.

(रु.लाखात)

| बँकेचे नाव | ओव्हरड्राफ्ट मर्यादा | मुदत ठेव तारण |
|---|---|---|
| डी.सी.सी.बँक सातारा शाखा | ३१९.५० | ३५५.०० |
| बँक ऑफ बडोदा, सातारा शाखा | ११२.५० | १२५.०० |

तसेच एचडीएफसी बँकेतील खालीलप्रमाणे ठेव ATM व POS (Point of Sale) सुविधेच्या तरलता मर्यादेकरिता (Liquidity Limit) तारण ठेवण्यात आली आहे.

(रु.लाखात)

| बँकेचे नाव | तारणाचे कारण | तरलता मर्यादा | तारणठेव |
|---|---|---|---|
| एच.डी.एफ.सी.बँक | (ATM करिता) | २०.०० | ४०.०० |
| | (POS करिता) | १०.०० | २०.०० |

वरील ओव्हरड्राफ्टची सुविधा वापरल्याचे प्रसंग वर्षात अत्यल्प होते. मुख्यालयाने गरजेनुसार या सुविधेचा उपयोग केला. मार्च २०२१ अखेर वापरण्यात आलेल्या ओ.डी.पैकी बाकी निरंक आहे.

### ९. नफा विभागणी

अहवाल सालात आपल्या बँकेने रु.१९१.२५लाख इतका निव्वळ नफा नोंदविला आहे. मागील वर्षाचा शिल्लक नफा रु.०.०१लाख इतका होता. त्यामुळे मार्च २०२१ अखेरचा नफा रु.१९१.२६लाख इतका आहे. रिझर्व्ह बँकेच्या नियमाप्रमाणे एन.पी.ए. व उत्पन्नावरील आयकरासाठीची संपूर्ण तरतूद केल्यानंतर हा नफा नोंदविला गेला. मा.संचालक मंडळ यांनी खालीलप्रमाणे निव्वळ नफ्याची विभागणी करावी असा प्रस्ताव दिला आहे, त्यास कार्योत्तर मंजुरी मिळावी.

| | (रु.लाखात) |
|---|---|
| अ) वैधानिक राखीव निधी | ५०.०० |
| ब) लाभांश | ९८.०० |
| क) इमारत निधी | ०.०० |
| ड) गुंतवणूक चढउतार निधी | ३५.०० |
| इ) निवडणूक निधी | ५.०० |
| ई) सेवक कल्याण निधी | ०.५० |
| उ) इतर निधी-आयटी डेव्हलपमेंट निधी | २.७५ |
| ऊ) अविभाजित नफा पुढील वर्षासाठी वर्ग | ०.०१ |
| एकूण | रु.१९१.२६ |

### १०. लाभांश

संचालक मंडळाला आर्थिक वर्ष २०२०-२१साठी ६.५०% लाभांश देण्याची शिफारस करण्यास आनंद वाटतो, अर्थातच हा लाभांश सर्वसाधारण सभेत मंजूर करावयाचा आहे. नवीन सभासदांना गुंतवणुकीच्या प्रमाणात बँकेच्या पोटनियमाप्रमाणे लाभांश देण्यात येतो.

### ११. उत्पन्नावरील आयकर

बँकेने सन २०२०-२१ च्या उत्पन्नावरील करापोटी नफ्यामधून रु.१०७.२६ लाख एवढी रक्कम भरणा केली आहे.

### १२. थकबाकी वसूली

थकीत कर्जे वसूल करताना शक्यतो सामोपचाराने वसूलीचा प्रयत्न केला जातो. तो करताना सभासदांच्या अडचणींचाही सहानुभूतीपूर्वक विचार केला जातो. पण शेवटी एनपीएच्या तरतुदीचे निर्बंध विचारात घेता व त्यात वाढ झाल्यास रिझर्व बँकेकडून होणाऱ्या कारवाईचा विचार करता, बँकेला नाइलाजाने थकबाकीदार सभासदांविरुद्ध कायदेशीर कारवाई करावी लागते. प्रसंगी नोटीस पाठविणे, गहाण मिळकत ताब्यात घेणे व त्याची विक्री करणे अशी कठोर कारवाईही करावी लागते. अशी कठोर कारवाई करण्याची वेळ येऊ नये म्हणून सन्माननीय सभासदांनी काळजी घ्यावी अशी मी विनंती करतो.

मार्च २०२०अखेर बँकेचे थकीत कर्जाचे प्रमाण ६.१५% इतके होते ते मार्च २०२१ अखेर ५.८६% इतके आहे. गतवर्षाच्या तुलनेत अहवाल वर्षअखेर थकबाकीमध्ये ०.२९%ने घट झाली आहे. आर्थिक वर्ष सरतेशेवटी उद्भवलेल्या कोविड १९ वैश्विक महामारीमुळे व देशात झालेल्या लॉकडाऊनमुळे काही प्रमाणात बँकेचे थकबाकी व एनपीए प्रमाण वाढलेले पाहावयास मिळेल. तरीही बँकेने आटोकाट प्रयत्न करून ३१ मार्च २०२१ अखेर ढोबळ एन.पी.ए.चे प्रमाण १०.००% पेक्षा कमी, म्हणजेच ६.३७% इतके आटोक्यात ठेवण्याचा प्रयत्न केला आहे. तसेच मार्च २०२१ अखेरचे निव्वळ निष्क्रीय एनपीए चे प्रमाण ०.००% ठेवण्यामध्ये बँकेला यश मिळाले आहे. बँकेने सर्वच स्तरावर केलेल्या अथक परिश्रमामुळे थकबाकीचे व निव्वळ निष्क्रीय कर्जाचे प्रमाण खाली आणणे शक्य झाले आहे.

*(पुढे चालू .....)*

थकबाकीचा कालनिहाय तपशील खालीलप्रमाणे -

| कालावधी | एकूण खाती | रक्कम |
|---|---|---|
| अ) १ वर्षापर्यंत | १४३ | १०४.९१ |
| ब) १ वर्ष ते २ वर्षे | ५८ | ३४.७६ |
| क) २ वर्षे ते ३ वर्षे | २६ | २८.३० |
| ड) ३ वर्षे ते ४ वर्षे | २४ | ११५.२४ |
| इ) ४ वर्षे ते ५ वर्षे | २९ | २८.७२ |
| ई) ५ वर्षावरील | २७० | ७४४.९३ |
| एकूण | ५५० | १०५६.८६ |

आर्थिक वर्ष २०२०-२१अखेर महाराष्ट्र राज्य सहकारी संस्था अधिनियम १९६०चे कलम १०१नुसार ५०६ थकबाकीदारांविरुद्ध रु.१२५७.९५ लाख वसुलीसाठी दावे दाखल करण्यात आले. पैकी १५७ कर्जदारांकडून रु.६८.३९ लाख इतकी रक्कम वसूल करण्यात आली. इतर वसूलीसाठी प्रयत्न चालू आहेत.

कर्जदार हे आमचे सभासद असल्याने त्यांना आमचे कळकळीचे आवाहन आहे की, त्यांनी या वैश्विक महामारीमुळे उद्भवलेल्या परिस्थितीतही बँकेची स्थिती भक्कम राखण्याच्या हेतुने आपल्या कर्जाचे हप्ते व व्याज नियमित भरून बँकेला सहकार्य करावे व कायदेशीर कार्यवाही टाळावी. तसेच आपल्या बँकेच्या नफावृद्धीस हातभार लावावा.

कर्जाचे वर्गीकरण व तरतुदी यासंबंधी दक्षतेचे निकष लक्षात घेता बँकेने अनुत्पादित (संशयित व बुडीत) कर्जासाठी, निव्वळ नफा काढावयाच्या अगोदरच आवश्यकतेपेक्षा अधिक तरतूद केली आहे. अहवाल सालात अनुत्पादित कर्जापोटी एकूण रु.८५.०० लाख इतकी तरतूद केली. त्यामुळे वर्षअखेरीस अनुत्पादित कर्जापोटी एकूण तरतूद रु.१२५५.०० लाख इतकी झाली आहे.

### १३. अग्रक्रम व दुर्बल घटक क्षेत्रास कर्ज पुरवठा

सामाजिक बांधिलकी व रिझर्व्ह बँकेच्या धोरणानुसार, बँक अग्रक्रम व दुर्बल घटकांना कर्ज वितरित करते. आर्थिक वर्षात अग्रक्रम क्षेत्रास रु.८५८४.७० लाख म्हणजेच एकूण मागील वर्षाच्या कर्जाशी प्रमाण ४७.५७%, तर आर्थिक दुर्बल घटकांना रु.३७८८.३८ लाख म्हणजेच एकूण मागील वर्षाच्या कर्जाशी दुर्बल क्षेत्राचे प्रमाण २०.९९% इतके कर्ज वितरण करण्यात आले आहे. सदर प्रमाण रिझर्व्ह बँकेच्या निकषानुसार राखण्यात आले आहे.

### १४. भांडवल पर्याप्तता

रिझर्व्ह बँकेच्या आदेशानुसार नागरी सहकारी बँकांसाठी भांडवल पर्याप्तता ९% इतकी ठेवणे आवश्यक आहे. अहवाल वर्षअखेर आपल्या बँकेचे भांडवल पर्याप्तता प्रमाण हे १८.०१% आहे. सध्या भांडवल पर्याप्तता समाधानकारक असली तरी भांडवल व इतर निधी यामध्ये आवश्यक ती वाढ करण्यास बँक कटिबद्ध आहे. बँकेच्या नफ्यातून राखीव व इतर निधी यामध्ये वाढ करण्यात येईलच पण सभासदांना आमचे आवाहन आहे की, आपले सध्या असलेले भागभांडवल त्यांनी वाढवावे.

### १५. संचालक व त्यांच्या नातेवाईकांना दिलेली कर्जे

